"कोसाका" कोळपेवाडी
नं. ०७५०१- २०२ केपीएमडी एन

फोन नं. (एस. टी. डी. - ०२४२३) ६००१० ते ६००१८
फॅक्स नं. ०२४२३ - ६००१९



मा. श्री. शंकररावजी काळे
माजी खासदार

**दि कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर**
पो. कोळपेवाडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर.

**आशिया खंडात सहकारी क्षेत्रात स्थापन झालेला दुसरा सहकारी साखर कारखाना**

सहकार व शिक्षण महर्षी मा. श्री. शंकररावजी काळे साहेब, माजी खासदार यांच्या कुशल नेतृत्वाखाली कोसाका उद्योग समूह नेत्रदीपक प्रगती करीत असून पांढरी शुभ्र दाणेदार साखर निर्मिती शिवाय दर्जेदार स्पिरीट / देशी मद्य निर्मिती व बगॅसपासून उत्तम प्रतीच्या क्राफ्ट पेपरची निर्मिती तसेच बायोगॅस प्रदूषण नियंत्रण योजना, उपपदार्थ प्रकल्पांना राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता वापराबद्दल पारितोषिके व गौरव...



मे. आय. बी. पी. एल. ऊर्जा रिसर्च फौंडेशन, नवी दिल्ली यांच्यातर्फे ऊर्जा बचत पारितोषिक चांदीचा चषक, गोल्ड ट्रॉफी देऊन गौरव.

राष्ट्रीय उत्पादकता पारितोषिक, नॅशनल प्रॉडक्टिव्हिटी कौन्सिल, नवी दिल्ली यांच्यातर्फे व मा. नामदार डॉ. शंकरदयाळ शर्मा, राष्ट्रपती, भारत सरकार यांच्या शुभहस्ते देऊन गौरव.

मे. इंडियन पेपर मेकर असोसिएशन, कलकत्ता यांच्यातर्फे कार्यक्षमता वापर व ऊर्जा बचत पारितोषिक देऊन गौरव.

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ, नवी दिल्ली यांच्यातर्फे बगॅसच्या उत्कृष्ट वापराबद्दल प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरव.

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ, नवी दिल्ली यांच्याकडून उच्च साखर उतारा झोनमधील टेक्निकल इफिशियन्सी पारितोषिक देऊन गौरव.

व्ही. एस. आय., पुणे यांच्यातर्फे राज्य पातळीवरील सन १९९५-९६ गळितासाठी "हायेस्ट रिड्यूसुड ओव्हरऑल रिकव्हरी"चे प्रथम क्रमांकाचे बक्षीस देऊन गौरव.

सभासद व सामान्य शेतकरी, तसेच आमजनतेच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध.

सामुहिक उपसा जलसिंचन योजना.

ऊस विकासाच्या विविध योजना, कार्यक्षेत्रातील माध्यमिक शाळा तसेच तांत्रिक व माहाविद्यालयांना भरीव साहाय्य.

कारखाना कार्यक्षेत्रातील गोदावरी नदीवर कोल्हापूर टाईप बंधारे तसेच ओढ्या-नाल्यांवर दगडी साठवण बंधारे बांधून शेतीच्या पाण्यासाठी साहाय्य.

| | | |
|---|---|---|
| जी. जी. काकडे | आप्पासाहेब भिकाजी होन | अशोकराव शं. काळे |
| कार्यकारी संचालक | व्हाईस चेअरमन | चेअरमन |

सं चा ल क मं ड ळ

# जलसिंचन व संवर्धन



✦ कुशल मार्गदर्शक ✦
**माजी खासदार श्री. शंकरराव काळे**

✦ प्रकाशक ✦
**अशोकराव काळे**, चेअरमन



**दि कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर**
पो. कोळपेवाडी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर

# जलसिंचन व संवर्धन

## : संकल्पसिध्दी :

कोपरगांव तालुक्यातील ऐतिहासिक दुष्काळी परिस्थितीवर कायम स्वरूपी मात करण्याच्या एकमेव उद्देशाने दारणा धरणाचे ाक्षण उभारणी व कार्यन्वयन झाले. त्याचवेळी नांदुर-मदमेश्वर या ठिकाणी पिकअप वेअर-उंचावणीचा बंधारा–बांधण्यात येऊन ावरी उजवा व डावा तट कालव्याची निर्मिती झाली. गोदावरी कालव्यामुळे लाभक्षेत्रातील व परिसरातील भूगर्भातील पाण्याची ाळी सुधारण्यास मदत झाली. यामुळे या भागात उसासारखे बारमाही पीक व त्यावर प्रक्रिया करणारी साखर कारखानदारी या श्वत पाण्यामुळे निर्माण झाली, विस्तार पावली. एक आर्थिक बदल व सामाजिक सुरक्षितता व शांततेचे वातावरण निर्माण झाले.

गेल्या दहा वर्षांपासून गोदावरी कालव्याच्या पाण्याच्या उपलब्धतेमध्ये मोठ्या प्रमाणात घट झाल्याने लाभक्षेत्रातील शेतकरी, ामजूर व उद्योगधंद्यासह सर्वच घटक अडचणीत आलेले आहेत. यावर कारखाना परिसरात जलसंवर्धनाच्या दृष्टीने जलसंवर्धनांतर्गत देस्त नालाबंडींग, पाझर तलाव, भूमिगत बंधारे, गावतळी, दगडी बंधारे, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे इत्यादी प्रकल्प प्राधान्याने हाती लेले आहेत. कारखान्याच्या व्यवस्थापनाने गोदावरी नदीवर (नांदुर-मदमेश्वर पासून पुणतांबा गावापर्यंत) निरनिराळ्या ठिकाणी टी. वेअर्स बांधण्याचे दृष्टीने फार मोठे आर्थिक योगदान देऊन कार्यवाही केलेली आहे. या के. टी. वेअरबरोबरच कारखाना र्यक्षेत्रामध्ये छोट्या-मोठ्या नाल्यांवर दगडी बंधारेही बांधण्याच्या दृष्टीने कार्यवाही केलेली आहे. सदर बंधारे हे जवळ-जवळ पूर्णतः रखान्याने स्वनिधीमधूनच पूर्ण केलेले आहेत.

कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याची योजना म्हणजे नदीपात्रात बांध घालून नदीतून वाहणारा मान्सुनोत्तर प्रवाही पाणी अडवून ठविणे. तसेच अशाप्रकारे साठलेले पाणी जवळपासच्या उंचावरील शेतीस जलसिंचनाद्वारे पुरविता येते. तसेच या के. टी. वेअर्समुळे च्या परिसरातील भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास व नदीपात्राच्या दोन्ही बाजूकडील विहिरींना पाझर वाढून शाश्वत पाणी ा होण्यास मदत होते. विशेषतः या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यामुळे सुपीक अथवा पडीत अशी कोणतीही जमीन पाण्याखाली त नाही, भूसंपादनाची आवश्यकता नाही, त्यामुळे पुनर्वसनाचा प्रश्न उद्‌भवत नाही. सर्वसाधारणपणे सिंचन क्षेत्रात वाढ होण्यास त होते. आपले दि कोपरगाव सहकारी साखर कारखान्यामार्फत आपल्या सर्वांचे नेते आदरणीय माजी खासदार श्री. शंकररावजी ळेसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आपण डाऊचखुर्द, माहेगाव देशमुख, वडगांव-कानळद व सडे हे कोल्हापूर पद्धतीचे बंधारे र केलेले आहेत. या बंधाऱ्यास कारखान्याने महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक योगदान केलेले आहे. के. टी. वेअर हा कोपरगांव, संजीवनी व गणेश सहकारी या साखर कारखान्यांनी मिळून हाती घेऊन पूर्ण केला आहे. या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यासाठी कारखान्याने आजपर्यंत जवळ जवळ ५६३.५९ लाख रुपये खर्च केलेले असून या बंधाऱ्यामुळे ५८८८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येऊन कोपरगांव, सिन्नर, निफाड तालुक्यांमधील गावांना लाभ होत आहे. या बंधाऱ्यामुळे गोदावरी नदीमधून मान्सुनोत्तर काळात वाहून जाणारे जवळ जवळ ७८० दशलक्ष घनफूट पाणी अडविले जाणार आहे.

गोदावरी कालव्यांना मिळणारे पाणी हे पूर्ववत मिळाले पाहिजे यासाठी आपल्या सर्वांचे नेते आदरणीय शंकररावजी काळेसाहेब हे सतत प्रयत्नशील आहेत. त्याचबरोबर वरीलप्रमाणे कोल्हापूर पद्धतीचे बंधारे हाती घेऊन, पूर्ण करून काही अंशी पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न चालू आहे. कोल्हापूर भागात असलेल्या के. टी. वेअरमध्ये त्यावर असणाऱ्या धरणातून पाणी सोडण्यात येते. परंतु गोदावरी नदीवर बांधण्यात आलेल्या आपल्या या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यात धरणातून पाणी सोडण्याची सुविधा नाही.

कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याच्या माध्यमातून पाणी–आडवा-पाणी–जिरवा असा प्रयत्न करीत असतानाच कारखान्याने जवाहर रोजगार योजने अंतर्गत कोपरगांव, सिन्नर, निफाड व येवला तालुक्यात १९ गौतम दगडी साठवण बंधारे बांधलेले आहेत. यासाठी शासनाने जवळ जवळ ५१ लाख रुपये अनुदान दिलेले असून कारखान्याने स्वनिधीमधून रुपये ५० लाख खर्च केलेले आहेत. सदरचे बंधारे पोहेगाव, वेळापूर, धामोरी, बक्तरपूर, चांदेकसारे, सुरेगांव, रवंदे, मुर्शतपूर, कोकमठाण, भोजडे हे कोपरगांव तालुक्यातील असून, सांगवी, सोमठाणा हे सिन्नर तालुक्यातील, शिरवाडे, वाकद हे निफाड तालुक्यातील व सोमठाणदेश, धुळगांव व खैरगव्हाण हे येवला तालुक्यामधील साठवण बंधारे पूर्ण झालेले आहेत. या गौतम दगडी बंधाऱ्यामध्ये जवळ जवळ ५१ दशलक्ष घनफूट पाणी साठविण्याची क्षमता आहे. या सर्व गौतम दगडी बंधाऱ्यामुळे कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील जवळ जवळ ५०० विहिरींना पाझरामुळे पाण्याचा फायदा होत आहे. आज जलपूजन संपन्न होत असलेले वडगांव-कानळद ह्या के. टी. वेअरसाठी राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य कृषि व ग्रामीण विकास बँक, मुंबई यांनी रु. १२८.४५ लाखांचे कर्ज मंजूर केलेले आहे. या सर्व बंधाऱ्यांच्या कामासाठी महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे खात्याने सहकार्य दिलेले आहे.

वरीलप्रमाणे हाती घेतलेल्या जलसिंचन कार्यक्रमाबरोबरच गोदावरी नदीवर माहेगांव देशमुख, कुंभारी, वडांगळी, मंजूर इत्यादी ठिकाणी उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित केलेल्या असून यासाठी आतापर्यंत कारखान्याने रक्कम रुपये ५८.७३ लाख खर्च केलेले असून, यामध्ये जवळ जवळ ७५० लाभार्थी शेतकरी सभासद यांना फायदा होत आहे. या उपसा जलसिंचन योजनेखाली जवळ जवळ २४०० एकर क्षेत्राला पाण्याचा लाभ होत आहे. याशिवाय मंजूर, कारवाडी, माहेगांव देशमुख या ठिकाणी उपसा जलसिंचन योजना घेण्याची कार्यवाही सुरू असून त्यासाठी अंदाजे रुपये ९१.७१ लाख खर्च येणार आहे. या उपसा जलसिंचन योजनेद्वारे जवळ जवळ ३२५ एकर क्षेत्र पाण्याखाली येणार आहे. या उपसा जलसिंचन योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. या बरोबरच ज्या ज्या ठिकाणी योग्य व गरज असेल तिथे उपसा जलसिंचन योजना हाती घेण्याचा मानस आहे.

आपल्या भागातील पावसाची परिस्थिती विचारात घेता आपण कितीही पाणी आडविण्याचा प्रयत्न केला तरी कमीच पडणार आहे. यासाठी आपण पाण्याचा योग्य व काटकसरीने उपयोग करणे गरजेचे आहे. आता प्रगत शेती तंत्रज्ञान उपलब्ध झालेले आहे. त्याचाही फायदा सर्व सभासद शेतकरी बांधवांनी घेणे गरजेचे आहे. यामध्ये विशेषतः ठिबक जलसिंचन योजना व तुषार सिंचन योजना ही अतिशय महत्त्वाची व गरजेची बाब आहे. आतापर्यंतचा अनुभव विचारात घेता यामध्ये सभासद बंधूंनी तन्मयतेने लक्ष घातलेले नाही, त्यामुळे या योजनांचा लाभ घेण्यास आपण अपुरे पडलेलो आहोत. परंतु ह्या योजनांत सर्वांनी सहभागी होणे गरजेचे आहे. यासाठी सरकार भरीव प्रमाणात अनुदानेही देत आहे.

OOO

## वडगांव-कानळद के. टी. वेअरची ठळक वैशिष्ट्ये :–



| | | |
|---|---|---|
| । नांव | : | गोदावरी |
| ोट क्षेत्र | : | ४९३८ चौ. कि.मी. |
| याची एकूण लांबी | : | २७७ मीटर |
| ची उंची | : | ४ मीटर |
| ांची संख्या | : | ७४ |
| ाचा एकूण साठा | : | १७३ द. ल. घ. फू. |
| । क्षेत्र | : | १३०४ हेक्टर |
| ाचा खर्च | : | २१७.८८ लाख |
| सुरू झाल्याची तारीख | : | फेब्रुवारी १९९३ |
| । पूर्ण झाल्याची तारीख | : | जून १९९५ |
| क्षेत्रातील गांवे | : | बक्तरपूर, मोर्वीस, चास(नळी), सोमठाणे, कानळद, कोळगांव. |

## डाऊच खुर्द के. टी. वेअरची ठळक वैशिष्ट्ये




| | | |
|---|---|---|
| १. नदीचे नांव | : | गोदावरी |
| २. पाणलोट क्षेत्र | : | २४२३ चौ. कि.मी. |
| ३. बंधाऱ्याची एकूण लांबी | : | २२५ मीटर |
| ४. स्तंभाची उंची | : | ४.५० मीटर |
| ५. गाळ्यांची संख्या | : | ६३ |
| ६. पाण्याचा एकूण साठा | : | ८५ द. ल. घ. फू. |
| ७. सिंचन क्षेत्र | : | १०५८ हेक्टर |
| ८. योजनेचा खर्च | : | ९७.०७ लाख |
| ९. काम सुरू झाल्याची तारीख | : | एप्रिल १९९० |
| १०. काम पूर्ण झाल्याची तारीख | : | मे १९९२ |

लाभक्षेत्रातील गांवे - डाऊच खुर्द, डाऊच बुद्रुक, चांदगव्हाण, जेऊर कुंभारी, घारी, चांदेकसारे इ.

**टीप :** गोदावरी नदीला अती पावसाने अचानक पाणी वाढल्याने २८ सप्टेंबर १९९३ मध्ये के. टी. वेअर जवळ नदीकिनारा वाहून गेला. त्याच्या दुरुस्तीचे काम आता तातडीने हाती घेत आहोत.

## माहेगांव देशमुख के. टी. वेअरची ठळक वैशिष्ट्ये :-



| | | |
|---|---|---|
| १. नदीचे नांव | : | गोदावरी |
| २. पाणलोट क्षेत्र | : | ५४९० चौ. कि. मीं. |
| ३. बंधाऱ्याची लांबी | : | २३१ मीटर |
| ४. स्तंभाची उंची | : | ४.५० मीटर |
| ५. गाळ्यांची संख्या | : | ६७ |
| ६. पाण्याचा साठा | : | २४२ द. ल. घ. फू. |
| ७. सिंचन क्षेत्र | : | १६६१ हेक्टर |
| ८. योजनेचा खर्च | : | २०३.६४ लाख |
| ९. काम सुरू झाल्याची तारीख | : | ऑक्टोबर १९९१ |
| १०. काम पूर्ण झाल्याची तारीख | : | मे १९९३ |


लाभक्षेत्रातील गांवे - माहेगांव देशमुख, कोळगांवथडी, सुरेगांव, सांगवीभुसार, मळेगांवथडी, मायगांवदेवी इत्यादी

## सडे. के. टी. वेअरची ठळक वैशिष्ट्ये :–



| | | |
|---|---|---|
| १. नदीचे नांव | : | गोदावरी |
| २. पाणलोट क्षेत्र | : | २९८३ चौ. कि. मी |
| ३. बंधाऱ्याची एकूण लांबी | : | २४२ मीटर |
| ४. स्तंभाची उंची | : | ४.५० मीटर |
| ५. गाळ्यांची संख्या | : | ८१ |
| ६. पाण्याचा एकूण साठा | : | २७९ द. ल. घ. फू. |
| ७. सिंचन क्षेत्र | : | १८६५ हेक्टर |
| ८. योजनेचा खर्च | : | २९८.३० लाख |
| ९. काम सुरू झाल्याची तारीख | : | डिसेंबर १९९३ |
| १०. काम पूर्ण झाल्याची तारीख | : | जून १९९६ |

लाभक्षेत्रातील गांवे - सडे, संवत्सर, कोकमठाण, कोपरगांव, सावळविहीर



चांदेकसारे



जेऊर कुंभारी



शिरवाडे



सांगवी (सिन्नर)

## जवाहर योजने अंतर्गत कारखाना कार्यक्षेत्रात वेगवेगळ्या ठिकाणी बांधून पूर्ण झालेले गौतम बंधारे

| अ. नं. | बंधाऱ्याचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (रु. लाखात) | साठवण क्षमता द. ल. घ. फू. | प्रत्यक्षात झालेला खर्च (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|
| **अहमदनगर जिल्हा :** | | | | |
| (१) | धामोरी | ९.१८ | ५.२८ | १३.२५ |
| (२) | वक्तरपूर | ३.७६ | २.२० | ४.५८ |
| (३) | वेळापूर | २.५६ | १.४४ | २.८२ |
| (४) | चांदेकसारे नं. १ | ४.४६ | २.४६ | ५.८२ |
| (५) | पोहेगांव | ६.२३ | ३.५० | ८.२६ |
| (६) | रवंदे | ६.४५ | ३.६१ | २.८४ |
| (७) | चांदेकसारे नं. २ | २.०९ | १.२५ | १.९४ |
| (८) | मुर्शतपूर | ३.२० | १.८३ | १.२६ |
| (९) | सुरेगांव | १.५३ | ०.८८ | १.८१ |
| (१०) | कोकमठाण | १.९० | ०.७० | १.९९ |
| (११) | भोजडे नं. १ | १.९० | ०.७० | १.७८ |
| **नासिक जिल्हा :** | | | | |
| (१२) | सोमठाणा नं. १ | ५.९२ | ४.१८ | ८.६० |
| (१३) | सोमठाणा नं. २ | ७.४४ | ५.४३ | ९.३५ |
| (१४) | सांगवी | ४.७६ | ५.५६ | ६.८४ |
| (१५) | शिरवाडे (मोर्विस) | ४.३४ | ४.१६ | ६.५४ |
| (१६) | शिरवाडे (वाकद) | २.६४ | ३.१६ | ५.०६ |
| (१७) | सोमठाणा देश. | २.८० | २.०६ | ३.६० |
| (१८) | धुळगांव | २.४८ | १.४९ | २.२६ |
| (१९) | खैरगव्हाण | २.३३ | १.३५ | २.४२ |

शासनाकडून मिळालेले अनुदान रु. ५१.०० लाख

कारखान्याने स्वनिधीतून केलेला खर्च रु. ४०.०० लाखयाशिवाय मातीचे बंधारे बाधणेकामी कारखान्याने रक्कम रुपये १०.०० लाख खर्च केलेला आहे.

## कारखान्याच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली व आर्थिक सहभागाने चालविल्या जात असलेल्या उपसा जलसिंचन योजना

श्री सरस्वती उपसा जलसिंचन सहकारी संस्था,
वडांगळी व चोंढी : संस्थेची नोंदणी सन १९७८ : सभासद संख्या ३२८ : वडांगळी व चोंढी या दोन गावांचे १७०० एकर लाभक्षेत्र आहे. कारखान्याची एकूण आर्थिक गुंतवणूक रुपये ४० लाख आहे. संस्थेसाठी कारखान्याने केंद्र शासनाच्या शुगर डेव्हलपमेंट फंडातून १५.६३ लाखांचे कर्ज घेतले आहे.

- लिफ्ट इरिगेशन स्कीम मंजूर नं. १.
- कुंभारी माहेगांव देशमुख सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, कुंभारी.
- श्री दत्त दिगंबर उपसा जलसिंचन संस्था मर्यादित, माहेगांव देशमुख.
- साखर, आसवनी, कागद कारखान्यांतील सांडपाणी शुद्धिकरण योजना.
- हनुमान सहकारी उपसा जलसिंचन संस्था मर्यादित, शहापूर.
- गुरुवर्य तुकाराम बाबा उपसा जलसिंचन संस्था मर्यादित, कुंभारी.
- नियोजित जय श्रीराम सहकारी उपसा जलसिंचन संस्था मर्यादित, मंजूर.
- नियोजित जय हनुमान सहकारी उपसा जलसिंचन संस्था मर्यादित, मंजूर कारवाडी.
- नियोजित राधाबाई काळे सहकारी उपसा जलसिंचन संस्था मर्यादित, माहेगांव देशमुख.

**पाणी निर्मिले, पाणी अडविले ।**
**दारात शेतकऱ्यांच्या, लक्ष्मीची पावले ॥**